अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

''लातूर जिल्हयातील पाणी वापर संस्थांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थीक स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यास.''

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

संशोधक

गुरमे अमरदीप प्रमोदराव

मार्गदर्शक

डॉ. कोरपकवाड एकनाथ देवराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

जि. लातूर

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर

जि. लातूर

एप्रिल – 2019

संशोधकाचे नाव	:	श्री. गुरमे अमरदीप प्रमोदराव
	:	मोबाईल नंबर 7588875684
	:	ई-मेल आय डी. amardeepgurme@gmail.com

मार्गदर्शकाचे नाव	:	प्रा. डॉ. कोरपकवाड एकनाथ देवराव
	:	ई-मेल आय डी. natha791@gmail.com मोबाईल नंबर 9421364784 एम.ए.,सेट., पीएच.डी. संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्रउदयगिरी महाविद्यालय, उदगीर जिल्हा-लातूर

विषय	:	अर्थशास्त्र
संशोधन विषयाचे शीर्षक	:	“लातूर जिल्ह्यातील पाणी वापर संस्थांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचाअभ्यास”
संशोधन केंद्र	:	अर्थशास्त्र विभाग,शिवाजी महाविद्यालय, उदगीर,जि.लातूर

“लातूर जिल्ह्यातील पाणी वापरसंस्थांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यास”

प्रस्तावना:-

पाणी हे सर्वात मौल्यवान नैसर्गिक संपत्ती आहे. राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी पाण्याचे योग्य नियोजन, विकास व्यवस्थापन आणि योग्य उपभोग घेणे महत्त्वाचे आहे. भारत देश हा नैसर्गिक साधन सामुग्रीने सधन आहे. लोकशाहीवादी व विविधतेने संपन्नमिळवूपाहणारा व सर्व जगाला परिचित असलेला संपन्न असा देश आहे. पण वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणावर झालेले औद्योगीकीकरण, सिंचनाखालील शेती क्षेत्रामध्ये हरितक्रांतीनंतर प्रचंड झालेली वाढ यामुळे आपल्या देशातील लोकांची तहान वाढत आहे. याउलट जलप्रदूषणामुळे होणारी वाढ, भूगर्भात घालवणारी पाण्याची पातळी, अवेळी पडणारा मोसमी पाऊस पाणी वापराचे योग्य नियोजन यामुळे पाण्याची उपलब्धता घटत आहे. पाणी हा घटक प्रामुख्याने माणसा-माणसात, राज्या-राज्यात, देशा-देशांत संघर्ष निर्माण करणारा प्रश्न आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी हा घटक महत्त्वाचा आहे. भारताच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा 17 टक्के असून एकूण लोकसंख्येच्या 55 टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. देशाच्या एकूण भौगोलिक 328.73 मी. हेक्टर क्षेत्रापैकी 42 टक्के म्हणजेच 141 मी.हेक्टर जमीनही पिकाखालील क्षेत्र असून त्यापैकी निव्वळ सिंचित क्षेत्र म्हणजेच 65 मिली हेक्टर जमीन आहे. या सांख्यिकीय आकडेवारीचा विचार केला तर, केवळ 46 टक्के जमीन ही सिंचनाखाली असून 54 टक्के जमीन ही म्हणजेच 76 मिली हेक्टर जमीनही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.पाणी हे जीवनदायी आहे. जीवसृष्टीची मूलभूत गरज म्हणून त्याची नेहमीची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगीकरणाचा झालेला विकास व विकसित झालेले शेती क्षेत्र व भरमसाठ वाढलेले लोकसंख्या यामुळे पाणी व त्याची मागणी वापरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस व्यस्त होत असल्याचे चित्र सध्या जाणवत आहे. 2025 सालापर्यंत भारताची लोकसंख्या सुमारे1.39 अब्ज इतकी होईल. या वाढलेल्या लोकसंख्या साठी तितक्याच प्रमाणावर अन्नधान्याच्या आवश्यकता असेल व त्यामुळे शेतीच्या उत्पादनावरील ताण वाढेल.2025 पर्यंत सुमारे 611 दशलक्ष घनमीटर इतके पाणी प्रतिवर्ष शेतीसाठी आवश्यक आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर पाण्याची निकड आहे. आपल्या देशातील बऱ्याच प्रदेशात जून ते सप्टेंबर या काळात पाऊस पडतो. पण तो कधी मध्यम कधी अल्प तर कधी अति पर्जन्यवृष्टी

होते. जानेवारी महिन्यापासून दुष्काळाची झळ लागायला सुरुवात होते. पण तिकडे देशांमध्ये जसे नागरीकरण आणि औद्योगिकीकरण वाढत जाईल त्यानुसार औद्योगिक पाण्याचा वापर वाढत जाईल आणि त्या प्रमाणात शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर मर्यादा येतील. भारत हा कृषिप्रधान देश आहे कृषी क्षेत्राची पाण्याची गरज पूर्णपणे भागवली जात नसल्यामुळे शेतीच्या विकासातून आत्मनिर्भर होणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्कावर मर्यादा येते. पाणी समस्यामहाराष्ट्राला नवीन नाही पाणी समस्येवर मात करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात झाले आहे परंतु यामध्ये पाहिजे तितके अपेक्षित यश मिळाले नाही. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी म्हणजेच पहिल्या वर्षी सिंचनआयोगाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. देशातील इतर राज्यांपेक्षा पाटबंधारे योजनांनामहाराष्ट्राने नेहमीच अग्रक्रम दिला आहे.देशामध्ये जेवढे धरणे आहेत त्यापैकी निम्मी धरणे ही महाराष्ट्रातआहेत. तरीही पाणी समस्येवर तोडगा सापडत नाही .

भारतामध्ये महाराष्ट्र हे एक महत्त्वाचे राज्य असून राज्याच्या आर्थिक विकासामध्ये कृषी व कृषी संलग्न क्षेत्र हे महत्त्वाची भूमिका निभावतात. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या दृष्टीने महाराष्ट्राचा देशांमध्ये तिसरा क्रमांक लागतो तर लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरा स्थान लागते. प्रशासकीय सोयीसाठी सहा महसूल विभागात विभागणी केली आहे. सन 2017 मध्ये सरासरी पावसाच्या फक्त 8.43 टक्के पाऊस पडला. राज्यातील 355 तालुक्यांपैकी 147 मध्ये अपुरा पाऊस तर 140 मध्ये सरासरी पाऊस आणि 62 मध्ये अतिरिक्त पाऊस पडला आहे. कृषी व संलग्न कार्य याक्षेत्राचा राज्याच्या स्थूल मूल्यवर्धि 2016-17 मध्ये सुमारे 12.2 टक्के वाटा झाला आहे. तरी लोकसंख्येचा मोठा हिस्सा कृषी क्षेत्रावर अवलंबूनआहे. एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी 17.43 मिलीहेक्टर जमीन पिकाखाली असून यापैकी फक्त 17 टक्के म्हणजेच 2.94 मिली हेक्टर जमीन सिंचनाखाली आहे. म्हणजेच 83 टक्के जमीन ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

राज्याच्या आर्थिक विकासात कृषी व संलग्न क्षेत्र ही महत्त्वाची भूमिका बजावतात. पण पाण्याचे नियोजन केल्याशिवाय शेतकरी हा स्वावलंबी होणार नाही व राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार नाही. या कारणास्तव महाराष्ट्र शासनाने जलसंपदा विभागाने महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प हा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम जागतिक बँकेच्या सहकार्याने हाती घेतला आहे. महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम 2005 (MMSIF) अशा प्रकारचा कायदा करून सिंचन व्यवस्थापनामधील एक क्रांतिकारी व शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला आहे. पाणी या घटक ग्रामीण भागात विचारात घेतला असता, शेतकरी हा त्यात घटकाचा केंद्रबिंदू आहे. सिंचन व्यवस्थेच्या

माध्यमातून पिकांना पाणी दिले जाते या पाण्याच्या उपलब्धतेवर तेथील आर्थिक विकास अवलंबून असतो. त्यामुळे शेतीसाठी पाणी व्यवस्थित मिळाले पाहिजे व तिचे व्यवस्थापन झाले पाहिजे व सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, अशा विचारातून पाणीवापर संस्था निर्माण झाल्या. या पाणीवापर संबंधात महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास 1960 तसेच नवीन कायदा 2005 मध्ये पाणी वापर संस्था हा कायदा सहकारी विभागाशी संबंधित कायद्याच्या स्वरूपात अस्तित्वात आला असून पाण्याचे व्यवस्थित नियोजन करण्यासाठी सिंचनपद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन होण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. हा कायदा सहकारी चळवळी मधील एक टप्पा असून या कायद्यानुसार पाणीवापर संस्था निर्माण करून त्यामध्ये शेतकऱ्यांचा सहभाग करून घेणे व पाण्याचे वितरण करणे हे त्याचे उद्देश असल्याचे दिसून येते. जलक्षेत्रातील नियमित यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जलसंपत्तीचे नियंत्रण प्राधिकरणाची स्थापनाऑगस्ट 2005 करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे.शेतकऱ्याद्वारे सिंचन प्रणालीचे व्यवस्थापन करण्याकरिता राज्यात एकूण 5326 पाणी वापर संस्था सप्टेंबर 2017 अखेर स्थापन झाले आहेत. राज्यांमधील एकूण 36 जिल्ह्यांमधून पाणीवापर संस्थेचा अभ्यास करण्यासाठी लातूरजिल्ह्यामध्ये कार्यरत असणाऱ्या पाणी वापर संस्थांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्याबदलाचाअभ्यास करण्याचे ठरवले आहे.

- **अभ्यास विषयाचे महत्व :-**

पाणी सर्वात मौल्यवान नैसर्गिक संसाधन आणि सर्व मालमत्ता आहे. देशाच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी योग्य नियोजन विकास व्यवस्थापन आणि त्याचा सर्वात उत्तम वापर करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. भारतात जसे नागरीकरण आणि औद्योगिकीकरण वाढत जाईल त्यानुसार औद्योगिक पाण्याचा वापर वाढत जाईल आणि त्या प्रमाणात शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर मर्यादा येतील. भारत हा कृषिप्रधान देश आहे. कृषी क्षेत्राची पाण्याची गरज पूर्णपणे भागवली जात नसल्यामुळे शेतीच्या विकासातून आत्मनिर्भर होण्याच्या शेतकऱ्याच्या हक्कावर गदा येते. अवर्षण काळात विशेषता अल्पभूधारक शेतकऱ्यांची दैनी अवस्था होते. अशा परिस्थितीत दैवाला दोष देत आत्मसन्मान राखण्यासाठी बळीराजाला स्वतःचा बळी द्यावा लागतो.शेतकरी आत्मनिर्भर होण्यासाठी जलसिंचनविभागाने पाण्याचे नियोजन करण्यासाठी पाणी वापर संस्थांची निर्मिती केली. या संस्थेचे निर्मिती झाल्यामुळे महाराष्ट्रातीलवाघाड प्रकल्प हा यशस्वीरित्या पार पडला. या संस्थेमार्फत गाळाने भरलेले बंधारे काढले व यातील माती शेतीमध्ये टाकली यामुळे जमिनीचा पोत वाढला, नदीवर

बंधारे तयार करण्यात आली, पुनर्भरण, जमिनीतील पाणी पातळी वाढणे, पाण्याची शाश्वती, बारा माही शेती, लोकसहभागातून गावचा विकास, पाणी व्यवस्थापन, शेतकऱ्याचे उत्पन्न, रोजगार, पिकांची उत्पादकता, पिकांची रचना इत्यादी घटकांमध्ये अमूल्य बदल झाला आहे. त्यामुळे पाण्याचे नियोजन व शेतकऱ्यांना मिळणारी उत्पन्नाची शाश्वती यामुळे पाणी वापर संस्थांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

- **अभ्यास विषयाची गरज :-**

पाणी हा शेतीचा केंद्रबिंदू म्हणून विचार केला तर, भारताच्या सद्य परिस्थितीचा आढावा घेतला असता एकूण पिकाखालील भौगोलिक क्षेत्रापैकी केवळ 40 टक्के जमीन ही सिंचन प्रगत आहे. 54टक्के जमीन ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. तसेच विशेष संदर्भ म्हणून महाराष्ट्राचा विचार केला तर एकूण पिकाखालील भौगोलिक क्षेत्रापैकी केवळ 17 टक्के जमीन ही संचित असून 83 टक्के जमीन ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. महाराष्ट्र शासनाने पाण्याचा शेतीसाठी नियोजनबद्ध वापर करण्यासाठी व शाश्वत शेती निर्माण करण्यासाठी नवीन योजनांची अंमलबजावणी केली आहे. यामध्ये जलयुक्त शिवार अभियान, पर्जन्य आधारित क्षेत्र विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रति थेंब अधिकपिक, कोरडवाहू शेती अभियान इत्यादी या सर्व योजना शेतीसाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. पाणीवापर संस्थेमुळे जलसिंचन विभाग आणि लोकसहभागामुळे जल व्यवस्थापन लोकसहभाग समन्याय व कार्यक्षमता वाढवण्यासाठी, पाण्याचे समन्यायी वाटप व काटकसरीने वापर करण्यासाठी, एक पद्धतीवरून खरीप,रब्बी आणि उन्हाळी पीक पद्धतीचा लाभ कसा घेता येईल, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि जीवनमान कसे वाढतयेईल, सिंचन क्षेत्र कसे वाढवता येईल, रोजगारांमध्ये बद्दल, पिक रचनेतील बदल आणि त्यांची उत्पादकता पाणीवापर संस्थांची कार्यप्रणाली इत्यादीदृष्टिकोनातून पाणी वापर संस्थां महाराष्ट्रभर पसरले आहेत. महाराष्ट्रामध्ये उपलब्ध जलसंपत्तीचे प्रमाण सर्व भागात सर्व काळी अतिशय विषम स्वरूपाचे आहे. राज्याच्या काही भागात पाण्याची विपुलता असले तरी बहुतांशी भागात पाण्याची टंचाई आहे आहे. या कारणास्तव लातूर जिल्ह्यातील लोकसहभागातून पाणी वापर संस्थाकार्यरत असूनया संस्थांमुळे जिल्ह्यातील पाणी व्यवस्थापन,लोकसहभाग, सिंचन क्षमता, शेतकऱ्यांचे आर्थिक व जीवन राहणीमान यात काही बदल झाला आहे का हे पाहण्यासाठी या अभ्यास विषयाची गरज आहे.

- **अभ्यास विषयाचे उद्दिष्टः-**

1. लातूर जिल्ह्यातील पाणी वापर संस्थांमुळेलाभधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
2. लातूर जिल्ह्यातील पाणी वापर संस्थांच्या कार्यपद्धती व कार्यक्षमतेचा अभ्यास करणे.
3. लातूर जिल्ह्यातील पाणीवापर संस्थांमुळे ओलिताखालील क्षेत्रव पीक रचनेत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
4. पाणी वापर संस्थांच्या समस्यांचा शोध घेऊन त्यावर केलेल्या उपाय योजनेचा अभ्यास करणे.

- **अभ्यास विषयाची गृहीतकेः-**

1. लातूर जिल्ह्यातील कायरत पाणी वापर संस्थांपैकीकाही अकार्यक्षम जाणवतात.
2. पाणी वापर संस्थांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल होतो.
3. पाणी वापर संस्थांचा विस्तार व ओलिताखालील क्षेत्र यात तफावत जाणवते.

- **अभ्यास विषयाची व्याप्ती :-**

- **भौगोलिक क्षेत्रः-**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील लातूर जिल्ह्याची निवड करण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यांमधून एकूण 50 पाणी वापर संस्थांमधून कार्यरत व सक्षम अशा 12 पाणी वापर संस्थांची निवड करून, शेतकऱ्यांच्या धारण क्षेत्रानुसार अभ्यास करण्यात येणार आहे.

- **कालावधीः-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व ज्योती साधनाचा वापर करण्यात येणार आहे. निवडलेल्या पाणीवापर संस्थेतील लाभधारक शेतकऱ्यांच्या प्रश्नावली च्या मदतीने त्यांच्या आर्थिक बाजूचा अभ्यास करण्यात येणार आहे. तरद्वितीय माहिती वर्ष 2009ते वर्ष 2019 मधील पाणीवापर संस्थे संबंधित तसेच सिंचन संबंधित प्रकाशित व अप्रकाशित माहितीचा आधार घेण्यात येणार आहे.

➢ **संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधनासाठी "लातूरजिल्ह्यातील पाणी वापरसंस्थांमुळे शेतकऱ्यांच्याआर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचाअभ्यास"सन 2009 ते 2019 या विषयाची निवड केली आहे.या संशोधनात लातूर जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाने निर्माण केलेले मोठे, मध्यम व लघु प्रकल्पावरील पाणी वापरसंस्थांचा अभ्यास केला जाणार आहे.तथ्य संकलनासाठी खालील साधनाचा वापरकरण्यात येणार आहे.

- **प्राथमिक स्त्रोत-**

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण 50 पाणी वापर संस्थांना पैकी 25% नमुना निवड करून 12 पाणी वापर संस्थांचा अभ्यास केला जाणार आहे. तर जिल्ह्यातील 12 संस्थांचे प्रत्येकी 40 लाभार्थी शेतकरी याप्रमाणे एकूण 480 शेतकऱ्यांशी चर्चा करून प्रश्नावली भरून घेतली जाणार आहे.

- **दुय्यम स्त्रोत-**

प्रस्तुत संशोधनासाठी महत्वपूर्ण माहिती व आकडेवारी दुय्यम स्त्रोतांद्वारे प्राप्त केली जाणार असून, त्यामध्ये अप्रकाशित सार्वजनिक प्रलेख, प्रकाशित सार्वजनिक प्रलेख, महाराष्ट्र राज्य व लातूर जिल्ह्यातील पाटबंधारे विभागातील आकडेवारी, वर्तमान पत्रातील लेख, मासिके, पाटबंधारे विभागाचे अहवाल, पाणी वापर संस्थांचे अहवाल, इत्यादीद्वारे माहिती संकलित केली जाणार आहे.

➢ **नमुना निवड**

❖ एकूण पाणी वापर संस्था व लाभधारक संख्या

लातूर जिल्ह्यातील सहकारी पाणी वापर संस्थांचा अभ्यास करण्यात येणार असून, एकूण 50 पाणी वापर संस्था ह्या जिल्हाभर कार्यरत आहेत. ह्या संस्था मोठे, मध्यम वलघु प्रकल्पात विभागले आहेत. त्यांचे एकूण 13,208 इतके लाभधारक संख्या असून त्यांचे वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

अ.क्र.	**प्रकल्प**	**संस्थांची संख्या**	**लाभधारकांची संख्या**
1	मोठे प्रकल्प	17	5,647
2	मध्यम प्रकल्प	02	400
3	लघु प्रकल्प को.पा.ब.व सा.त.	31	7,161
एकूण संस्था व लाभधारक		**50**	**13,208**

स्त्रोत- पाठबंदारे विभाग लातूर जिल्हा 2017

या संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील 50 पाणी वापर संस्थापैकी 12 पाणी वापरसंस्थांची निवड केले आहे. जिल्ह्यात एकूण 50 पाणी वापर संस्थांच्या सभासद संख्यांचा विचार केल्यास आकडेवारीनुसार 13,208 इतके सभासद असून नमुना पाहणीसाठी एकूण 12 (25 टक्के) नमुना म्हणून निवडलेल्या पाणी वापर संस्थांचे प्रत्येकी 40 लाभधारक याप्रमाणे 480 लाभधारकांची निवड करण्यात आली आहे. ही निवड करताना साधा याद्दच्छिक नमुनानिवडीतर्गतलॉटरी पद्धतीने लाभधारकांची निवड करण्यात येणार आहे.

- **नमुना निवडीचा आकृतिबंध**

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यात एकूण 50 पाणी वापर संस्था कार्यरत असून, साधा याद्दच्छिक नमुना निगडीतर्गत लॉटरी पद्धतीने 12 (25 टक्के) पाणी वापर संस्थांची निवड केली आहे. तसेच नमुना निवड केलेल्या 12 पाणी वापर संस्थांच्या प्रत्येकी 40 असे 480 लाभधारकांची निवड केली जाणार आहे. धरण क्षेत्रानुसार मोठे, मध्यम व अल्प अशी लाभधारकांची वर्गवारी करून 40 लाभधारकांची मोठे 12, मध्यम 16 आणि अल्प 12 अशी प्रश्नावली तयार केली जाणार आहे. संस्थांची संख्या व लाभधारकांची संख्या पुढील तक्त्यात दर्शवली असून, त्यावरून नमुना निवड करण्यात येणार आहे.

अ.क्र.	प्रकल्प	संस्थांची संख्या	नमुना निवड संस्था (25 टक्के)	एकूण लाभधारकांची संख्या	नमुना निवड केलेल्या संस्थांचे प्रत्येकी 40 याप्रमाणे लाभधारक
1	मोठे प्रकल्प	17	03	5,647	120
2	मध्यम प्रकल्प	02	01	400	40
3	लघु प्रकल्प को.पा.ब.व सा.त.	31	08	7,161	320
एकूण आणि नमुना निवड केलेल्या संस्था व लाभधारक		50	12	13,208	480

स्त्रोत- पाठबंदारे विभाग लातूर जिल्हा 2017

- **अभ्यास विषयाच्या मर्यादा:-**

1. **प्रस्तुत संशोधन लातूर जिल्ह्यात पुरताच मर्यादित आहे.**
2. **पाणी वापर संस्था आणखी विकसित नसल्यामुळे नमुना निवडीच्या मर्यादा येतात.**
3. **प्रस्तुत संशोधनासाठी वर्ष2009ते 2019 पर्यंतचा कालावधी निश्चित केलाआहे.**
4. **प्रस्तुत संशोधनात फक्त पाणी वापर संस्था मुळे झालेल्या बदलाचा विचार केला आहे.**
5. **प्रस्तुत संशोधन फक्त शेतकरी वर्गाबद्दल विचार केला आहे.**

- **प्रकरण रचना:-**

प्रकरण पहिले:- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, जलसिंचन व त्याचा अर्थ, महत्व, भारतातील जलसिंचनाचे सद्यस्थिती, भारतातील राज्यनिहाय सिंचन क्षेत्र,भारतातील सिंचन व्यवस्थापन, भारतातील जल व सिंचन आयोग, भारतातील प्रकल्प आणि सिंचन क्षमता, मोठे, मध्यम व लघु राज्यस्तरीय प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र,भारतातील सिंचन संबधीत योजना इत्यादीचा अभ्यास केला आहे.

प्रकरण दुसरे:- संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणांमध्ये प्रस्ताविक,संशोधनाचा हेतू, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन पद्धती, संशोधनाची नमुना निवड, संशोधनाच्या मर्यादा व संदर्भ साहित्याचा आढावा या घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे:- लातूर जिल्ह्याचीअर्थव्यवस्था व**सिंचन** व्यवस्था

प्रस्तावना, लातूरजिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान, प्राकृतिक रचना, हवामान, नद्या, पर्जन्यमान, भूमी उपयोजन, मोठे, मध्यम व लघु प्रकल्पाची संख्या, सिंचन क्षेत्र, सिंचन आयोग, जिल्ह्याचीसिंचन क्षेत्राची प्रगती, सिंचन स्त्रोत, पाठबंदारे प्रक्लपाची पगती, जिल्ह्यातील प्रक्लपातील पाणीसाठा व वापर इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे:- लातूर जिल्ह्यातील पाणी वापर संस्थांच्या कार्यप्रणालीचे विवेचन

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, पाणी वापर संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, उद्देश, लाभार्थीचे हक्क,सभासदांच्या जबाबदाऱ्या, संस्थेचे सभासदत्व, संस्थेच्या निधीची साधने, संस्थेचे हक्क, नफ्याची वाटणी, व्यवस्थापन समिती, व्यवस्थापन समितीची निवड, संस्थेच्या उपविधीतील दुरुस्ती, संस्थेचे स्पष्टीकरण आणि सभासदांची अपात्रता इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे:- लातूरजिल्ह्यातील पाणी वापर संस्थांचे आर्थिक अध्ययन

या प्रकरणात प्रस्तावना, पाणी वापर संस्थांना झालेले जलवितरण, सभासद संख्या,प्रत्यक्ष लाभधारक सभासद संख्या, संस्थांचे कार्यक्षेत्र, पाणी पुरवठासंस्थांचेएकूणसिंचन क्षेत्र, संस्थांची भांडवलातील वाढ, संस्थांमधील जमा पाणी पट्टी, प्राप्त झालेले अनुदान, कॅनलदुरुस्ती खर्च, पाणी पुरवठा संस्थांचे व्यवस्थापन खर्च, संस्थांचे कर्जे, पाणी पुरवठा संस्थांची थकबाकी इत्यादीबाबीचाअभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे:- सामग्री विश्लेषण

या प्रकरणात प्राथमिक व द्वितीय साधनांच्या माध्यमातून माहितीचे संकलन करण्यात येणार असून, प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्र भेट देऊन दोन्ही जिल्ह्यातील नमुना लाभार्थी शेतकरी व सभासद यांच्यासाठी प्रश्नावली, सरकारी अधिकारी मुलाखत इत्यादींचा उपयोग केला जाणार आहे. द्वितीय माहितीद्वारे जिल्ह्याचे आर्थिक अध्ययन, पाणी वापर संस्थांची कार्यप्रणाली व आर्थिक घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे:-निष्कर्ष व शिफारशी

लातूरजिल्ह्यातील पाणी वापर संस्थांची स्थिती, गरज व पाणी वापर संस्थांमुळे लाभार्थी शेतकऱ्यांच्या आर्थिकघटकांवर झालेले सर्व प्रकारचे परिणाम याबाबत निष्कर्ष काढणे. समन्यायी पद्धतीने पाण्याचे वाटप, संस्थांमध्ये लोकसहभाग आणि व्यवस्थापन याबाबत शिफारशी करणे.

संदर्भसूची:-

1. भारत सरकारच्या वार्षिक अहवाल 2017-18, कृषी विभाग, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार, कृषी भवन, नवी दिल्ली- 11001.
2. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2017- 18, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.
3. आगलावे प्रदीप, 2000, संशोधन पद्धती शास्त्र वतंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. महाराष्ट्र जल वसिंचन आयोग अहवाल, तात्विक विवेचन खंड -1, महाराष्ट्र शासन मुंबई, जून 1999.

5. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, जिल्हा निहाय विवेचन, महाराष्ट्र शासन मुंबई, 2017.
6. दळवी संतोष, नाशिक जिल्ह्यातील पाणी वापरसंस्थांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिकस्थितीत झालेल्या बदलाचा चिकित्सक अभ्यास, पीएचडीप्रबंध सादर पुणे विद्यापीठ, पुणे.
7. डॉ. वासंतीरामस, दक्षिण महाराष्ट्रातील पाणी वापर संस्था आणि राजकारण, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
8. अविनाश सुर्वे, राज्यातील पाणी वापर संस्थांची दशा आणि दिशा, महाराष्ट्र जलसिंचन विभाग, फेब्रुवारी 2017.

संशोधक

गुरमे अमरदीप प्रमोदराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. कोरपकवाड एकनाथ देवराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,महाराष्ट्रउदयगिरी महाविद्यालय, उदगीर
जिल्हा-लातूर

संशोधन केंद्र
अर्थशास्त्र विभाग,शिवाजी महाविद्यालय, उदगीर,
जि.लातूर